सन्माननीय महोदय,

सप्रेम नमस्कार वि. वि.

बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी यांच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने "वृक्षा रोपन - संवर्धन, स्वच्छ भारत अभियान व जलव्यस्थापनातील युवकांची भूमिका" विशेष श्रमसंस्कार शिबीर उपळाई (ठो) येथे दिनांक १६ जानेवारी २०१९ ते २२ जानेवारी २०१९ या कालावधी मध्ये आयोजित केलेले आहे. तरी आपण शिबीर स्थळी भेट देऊन शिबिरार्थींना प्रोत्साहनपर मार्गदर्शन करावे.

आपले नम्र

मा. सौ. संतोषी हरिश्चंद्र कांबळे
(सरपंच, ग्रा.पं. उपळाई (ठो.)

मा. श्री. अण्णासाहेब लुंगसे
(उपसरपंच, ग्रा.पं. उपळाई (ठो.)

मा. श्री. सुंदरराव उर्फ बाळासाहेब पाटील
(मा.उपसरपंच, ग्रा.पं. उपळाई (ठो.)

मा. सौ. सारिका राऊत
(तलाठी उपळाई (ठो.)

मा. श्री. मुकुंदराव जगदाळे
(ग्रामविकास अधिकारी उपळाई (ठो.)

मा. श्री. सयाजीराव गायकवाड
(कृषी सहाय्यक अधिकारी उपळाई (ठो.)

ग्रा.पं. सदस्य , कर्मचारी व सर्व ग्रामस्थ उपळाई (ठो.)

### शिबिरातील दिनचर्या

| | | |
|---|---|---|
| सकाळी | ६.०० ते ८.०० | नवचेतना शिबीर, हजेरी, अल्पोपहार |
| सकाळी | ८.३० ते १२.३० | श्रमदान |
| दुपारी | १.०० ते ४ | भोजन व विश्रांती |
| दुपारी | ४.३० ते ५.३० | व्याख्यान |
| सायं | ६.०० ते ७.३० | ग्रामस्थ भेट / जनजागृती |
| रात्री | ८.०० ते ९.०० | भोजन |

निमंत्रण पत्रिका

प्रति,

मा.____________________

____________________

____________________

प्रेषक

प्राचार्य
मेजर डॉ. एस. के. पाटील

प्रा. डॉ. संतोष जामगे व प्रा. किरण चपटे
कार्यक्रमाधिकारी रा. से. यो.

बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी.
फोन नं. (०२१६८) २२२५३१




स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर




॥ एकमेका साह्य करू । अवघे धरू सुपंथ ॥




श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचालित
बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी.
ता. बार्शी, जि. सोलापूर
(सोलापूर विद्यापीठ सोलापूर संलग्नित)

राष्ट्रीय सेवा योजना NATIONAL SERVICE SCHEME

राष्ट्रीय सेवा योजना

" वृक्षारोपन - संवर्धन, स्वच्छ भारत अभियान व जलव्यस्थापनातील युवकांची भूमिका"

"NOT ME BUT YOU"

विशेष श्रमसंस्कार शिबीर सन २०१८-१९

शिबीर स्थळ
किसान कामगार विद्यालय,
जि प. प्रा. शाळा नं १ व नं २

शिबीर कालावधी
बुधवार दि. १६/०१/२०१९ ते दि. २२/०१/२०१९

कार्यक्रम पत्रिका

# सस्नेह निमंत्रण

## शिबीर उद्घाटन

बुधवार दि. १६/०१/२०१९ सायं ४.०० वाजता

उद्घाटक - मा. श्री. विनयजी संघवी (उद्योजक)

अध्यक्ष - मा. श्री. नंदनजी जगदाळे
(उपाध्यक्ष, श्री.शि.शि.प्र. मं.,बार्शी)

प्रमुख पाहुणे- मा. श्री. व्ही. एस. पाटील
(सचिव, श्री.शि.शि.प्र. मं., बार्शी)

मा. श्री. जयकुमार शितोळे
(संचालक, श्री. शि.शि.प्र. मं.,बार्शी)

प्रमुख उपस्थिती -

प्राचार्य. डॉ. एस.के.पाटील

मा. सौ. संतोषी हरिश्चंद्र कांबळे
(सरपंच, ग्रा.पं. उपळाई (ठो.)

मा. श्री. अण्णासाहेब लुंगसे
(उपसरपंच, ग्रा.पं. उपळाई (ठो.)

मा. श्री. सुंदरराव उर्फ बाळासाहेब पाटील
(मा.उपसरपंच, ग्रा.पं. उपळाई (ठो.)

### शिबिरातील उपक्रम

जल साक्षरता व जल व्यवस्थापन

ग्राम सफाई

आरोग्य तपासणी शिबीर

सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन

बंधारा निर्मिती

महिला प्रबोधन व मेळावा

व्यक्तिमत्व विकास

वृक्ष संवर्धन

## -बौद्धिक व प्रबोधनात्मक कार्यक्रम-

गुरुवार दि. १७ जानेवारी २०१९ रोजी सायं. ४.३० वा.

विषय - आजच्या युवकांपुढील आव्हाने

वक्ते - प्रा. डॉ. प्रदीप पांडुरंग इंगळे

अध्यक्ष-मा श्री सुंदरराव उर्फ बाळासाहेब पाटील
(मा.उपसरपंच, ग्रा.पं. उपळाई (ठो.)

शुक्रवार दि. १८ जानेवारी २०१९ रोजी सायं. ४.३० वा.

विषय- शाश्वत व आधुनिक शेती तंत्रज्ञान

वक्ते - मा. श्री. सयाजीराव गायकवाड
(कृषी सहाय्यक अधिकारी उपळाई (ठो.)

अध्यक्ष- मा. श्री. हनुमंत जामदार
(मा.पं.स. सभापती, बार्शी)

शनिवार दि. १९ जानेवारी २०१९ रोजी सायं. ७ वा.

विषय- कीर्तनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन

वक्ते - ह. भ.प.कु. भारती आडसूळ

अध्यक्ष- मा. श्री. आबासाहेब ठोगे

रविवार दि. २० जानेवारी २०१९ रोजी सकाळी ९ वा.

आरोग्य तपासणी शिबीर

जगदाळे मामा हॉस्पिटल, बार्शी


अध्यक्ष - मा. श्री. बाळासाहेब खराडे

सोमवार दि. २१ जानेवारी २०१९ रोजी सायं. ६.०० वा.

सांस्कृतिक कार्यक्रम

उदघाटक - प्रा. एन. आर. सारफळे

अध्यक्ष - मा. श्री. नवनाथ गाडेकर




## समारोप समारंभ

मंगळवार दि. २२ जानेवारी २०१९ रोजी सकाळी १०.०० वा.

प्रमुख पाहुणे-

मा. प्रा. दिलीप रेवडकर
(खजिनदार, श्री. शि.शि.प्र. मं., बार्शी)

अध्यक्ष-

मा. डॉ. बी. वाय. यादव
(अध्यक्ष, श्री.शि.शि.प्र. मं., बार्शी)

प्रमुख उपस्थिती-

मा. श्री. पी. टी. पाटील
(सहसचिव, श्री.शि.शि.प्र. मं., बार्शी)

मा. प्राचार्य. डॉ. एस.के.पाटील

सर्व कार्यकारिणी सदस्य व संस्था सदस्य, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी, व समस्त ग्रामस्थ मंडळी, उपळाई (ठो.)

### -संयोजन समिती-

| | |
|---|---|
| प्रा. डॉ. एस. बी. करंडे | प्रा. श्रीमती जे. आर. यादव |
| प्रा. एन. आर. सारफळे | प्रा. श्रीमती के. एस. वरडे |
| प्रा. बी. व्ही. लिंगे | प्रा. ए. जी. फटे |
| प्रा. बी. एस. वडने | प्रा. बी. डी. लांडे |
| प्रा. व्ही. पी. वाळके | प्रा. शरद वांगदरे |
| प्रा. एस. एन. फोके | प्रा. जी. बी. व्हळे |
| प्रा. डी. एन. कापसे | प्रा. श्रीमती एम. पी. शिंदे |
| प्रा. एम. ए. ढगे | श्री. डी. एल. घावटे |
| प्रा. डी. एम. सोनटक्के | श्री. आकाश मते |
| प्रा. कु. एम. बी. चव्हाण | |

रा.से.यो. विशेष

श्रमसंस्कार शिबिर छायाचित्रे

दिनांक :- 16 ते 22 जाने 2019




रासेयो विशेष श्रमसंस्कार शिबिर उद्घाटन
दि. 16-01-2019.








दि. 17-01-2019 रोजी वृक्षारोपण-संवर्धन स्वच्छता अभियान व जल व्यवस्थापनावर जनजागरण फेरी घेण्यात आली




दिनांक - 17-01-2019 रोजी ग्रामपंचायत व त्यासमोरील रस्त्याची सफाई करताना स्वयंसेवक









दिनांक 1[illegible]-01-19 रोजी बौध्दीक व प्रबोधनात्मक कार्यक्रमाच्या माध्यमातून "आजच्या युवकांपुढील आव्हाने या विषयावर व्याख्यान देताना प्रा.डॉ. प्रदीप इंगळे





दि. 18-01-2019 रोजी वृक्षसंवर्धनांतर्गत ~~8~~ वृक्षांना आळे व काठ्या लावताना स्वयंसेवक

तसेच शाश्वत व आधुनिक शेती तंत्रज्ञान या विषयावर व्याख्यान देताना सयाजीराव गायकवाड कृषी सहायक अधिकारी, बार्शी.





दि. 19-01-2019 रोजी स्मशानभूमीची स्वच्छता करताना स्वयंसेवक.

आधुनिक शेती व शेतीपुरक व्यावसाय या विषयावर व्याख्यान देताना प्रा. नित्यानंद घिटे.





दि. 19.01.2019 रोजी सायंकाळी किर्तनाच्या माध्यमातून वृक्षारोपण-संवर्धन, स्वच्छता अभियान व जलव्यवस्थापन या विषयावर ह.भ.प. कुमारी भारती अडसूळ संबोधनात्मक किर्तन करताना।






दि. 20-01-2019 रोजी ग्रामस्थांच्या आरोग्य तपासणी करिता जगदाळेमामा हॉस्पीटल बार्शी यांच्या मार्फत आरोग्य तपासणी करताना ~~डॉक्टर~~ आरोग्य अधिकारी.



दि.२०-१-२०१९ रोजी
व्यक्तीमत्व विकास वर
मार्गदर्शन करताना.
वाल्मीक तोरणे (PSI)





दि. 20-1-2019 रोजी स्वयंसेवकांना स्पर्धापरिक्षा
मार्गदर्शन करताना प्रा. बी. एस. वडणे.






दि. 21-1-2019 रोजी पाणीपुरवठा तलाव व विहिर परिसर स्वच्छ करताना स्वयंसेवक

दि. 21-1-2019 रोजी ग्रामस्थांचे प्रश्न समजून ~~घेताना~~ घेण्याकरिता सर्वेक्षण करताना स्वयंसेवक



सर्वेक्षण करताना रा.से.यो स्वयंसेवक










दि. 21-1-2019 रोजी सायंकाळी सांस्कृतीक कार्यक्रमाच्या माध्यमातून वृक्षारोपण-संवर्धन स्वच्छता अभियान व जलव्यवस्थापन इत्यादी सामाजिक प्रश्नांवर ग्रामस्थांचे प्रबोधनात्मक मनोरंजन करताना स्वयंसेवक.





दि. 22-01-2019 रोजी रा.से.यो. विशेष श्रमसंस्कार शिबिर समारोप समारंभ साठी उपस्थित मान्यवर, ग्रामस्थ व स्वयंसेवक



|| सत्यमेव जयते ||

# ग्रामपंचायत कार्यालय, उपळाई (ठोंगे)

ता. बार्शी, जि. सोलापूर


श्री. मुकुंद राम जगदाळे
* ग्रामविकास अधिकारी *
मो. ९४२०६६०९१८

श्री. सुंदरराव खासेराव पाटील
* उपसरपंच *
मो. ९६५७३०३०७१

सौ. संतोषी हरिचंद्र कांबळे
* सरपंच *
मो. ९८५०६९०३४२


* छोटे कुटुंब सुखी कुटुंब
* जन्म-मृत्यु उपजत मृत्यु व विवाह नोंदणी वेळेवर करा.
* ग्रामपंचायत कराचा भरणा वेळेवर करून सहकार्य करा.
* पाणी हे जीवन आहे, पाण्याचा वापर काटकसरीने करा.
* शौचालयाचा वापर करा. स्वच्छता राखा.
* वृक्ष लावा, वृक्ष जगवा.
* सार्वजनिक मालमत्ता आपली समजून तिचे जतन करा.
* केर-कचरा कचरा कुंडीतच टाका.
* वीजेचा वापर काटकसरीने करा.

जा.क्र.

दिनांक : २१ / ०७ / २०१८

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, बी.पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी च्या राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे उपळाई (ठों) ग्रामपंचायत येथे दि. २१.०७.२०१८ रोजी **वृक्षारोपन व जनजागर फेरी कार्याक्रमांतर्गत** ५०० रोपांची लागवड करण्यात आली.

स्थळ :- उपळाई(ठों)

दि. २१.०७.२०१८

सरपंच
ग्रा.पं उपळाई (ठोंगे)

ग्रामविकास अधिकारी
ग्रा.पं. उपळाई (ठों.), ता. बार्शी

# बी . पी .सुलाखे कॉमर्स कॉलेजच्या विद्यार्थ्यांकडून दत्तक खेडे उपळाई( ठोंगे) येथे वृक्षारोपण व जनजागरण फेरी

बार्शी :श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचालित बी . पी. सुलाखे कॉमर्स कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेनेमधील विद्यार्थ्यांनी उपळाई ठोंगे येथे शासन राबवीत असलेल्या वृक्ष लागवड या उपक्रमांतर्गत विक्रमी ५०० झाडांची लागवड केली .यावेळी काढण्यात आलेल्या जनजागरण फेरीमध्ये ' झाडे लावा , झाडे जगवा ', पशु पक्षांचे घर, झाडाचे शहर ' यासारख्या घोष वाक्यांनी गावातील परिसर दुमदुमून गेला. कॉलेजच्या 300 विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे या उपक्रमामध्ये आपला सहभाग नोंदविला.

या कार्यक्रमाचे उदघाटन उपळाई ठोंगे येथील प्राथमिक शाळेच्या प्रांगणात पार पडले . यावेळी व्यासपीठावर बी . पी. सुलाखे कॉमर्स कॉलेजचे प्राचार्य डॉ . एस के पाटील , कृषी अधिकारी श्री सयाजीराव गायकवाड , गावचे सरपंच बाळासाहेब पाटील ,कामगार विद्यालयाचे मुख्याध्यापक शेळके सर , पंचायत समिती सदस्य व प्राथमिक शाळेतील शिक्षकवृंद उपस्थित होते . या प्रसंगी उपस्थित मान्यवरांना १ झाड भेट देऊन अनोख्या पद्धतीने त्यांचे आदरातिथ्य करण्यात आले .

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना , डॉ एस के पाटील सरांनी हा कार्यक्रम कशासाठी व कोणत्या पद्धतीनी यशस्वी करायचा आहे तसेच याचे महत्व काय आहे हे मोजक्या शब्दात विद्यार्थ्यांना सांगून त्यांचे उदबोधन केले . श्री सयाजीराव गायकवाड विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले कि , वृक्षारोपण हि काळाची गरज आहे अन ती गरज ओळखून प्रत्येकाने एक झाड लावले पाहिजे व ते जगवले पाहिजे . त्यांना उपदेश करताना ते असेही म्हणाले कि" लावा लावी करायची असेल तर ती झाडांची करा .. .. माणसांची नको ". विद्यार्थ्यांनीही टाळयाच्या गजरात या वाक्याला प्रतिसाद दिला .

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा . डॉ.एस डी जामगे सर यांनी केले व डॉ. एस . बी करंडे सर यांनी आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. किरण चपटे , प्रा. नागनाथ सारफाळे , ग्रंथपाल श्रीमती ज्योती यादव , प्रा कवीता वरडे , प्रा. मोहिनी शिंदे ,प्रा. विजयकुमार वाळके , प्रा समाधान फोके . प्रा धोंडीराम कापसे , प्रा अमोल वीर, प्रा .महादेव कोरे, प्रा शरद वांगदरे व श्री मते यांनी परिश्रम घेतले .

Diwate's

# Red Alert Fire System

The Leading Fire Safety Service Provider Company in Maharashtra








रे/अ/फा/सि/जा/क/१२ दिनांक ः ९/०७/२०१८

प्रती,

मा . मुख्याध्यापक

विषय ः अग्नि सुरक्षा व आपत्कालीन व्यवस्थापनेची "सुरक्षा कार्यशाळात बाबत .

मा . महोदय

सदर पत्रादवारे आपणास विनंती करण्यात येत आहे रेड अलर्ट फायर सिस्टीम कंपनी आयोजीत "अग्नि सुरक्षा व आपत्कालीन व्यवस्थापन कार्यशाळा" आपल्या सलग्न सर्व शाळात घ्यावयाची आहे .

तरी आपली प्रतीकिया कळवावी .

आपला विश्वासू

रेड अलर्ट फायर सिस्टीम

डॉ० [illegible] कार्यवाहीसाठी [illegible] 31.7.18

श्री. [illegible] [illegible] 31.07.18

Reg Off: 16A, Shivajinagar, Mangalwedha Dist Solapur Pin – 413 305 Maharashtra
Cell : 9890 513 800, 9890 810 522,9421 282 381, Email : redalertfiresystem@gmail.com

पुढारी
News By
गणेश गोडसे, बार्शी

# सुलाखे महाविद्यालयात आपत्कालीन व्यवस्थापन कार्यशाळा

**बार्शी : तालुका प्रतिनिधी**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज येथे अग्निशमन मार्गदर्शन व आपत्कालीन व्यवस्थापनाची सुरक्षा कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

महाविद्यालयाच्या प्रांगणात शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत रेड अलर्ट फायर सिस्टीम दलाच्या घननीळ दिवटे यांनी प्रात्यक्षिके दाखवून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी आपत्कालीन व्यवस्थापनाची महत्त्वाची सूत्रे आणि सुरक्षा व्यवस्थापनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. के. पाटील हे होते. सूत्रसंचालन डॉ. एस. डी. जामगे यांनी, तर प्रा. किरण चपटे यांनी आभार मानले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी कॉलेजमधील सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

सोलापूर विद्यापीठ , सोलापूर

राष्ट्रीय सेवा योजना विभाग

रासेयो सात दिवसीय निवासी विशेष श्रमसंस्कार शिबीरामध्ये स्वयंसेवक / स्वयंसेविका यांच्या श्रमदानातून केलेल्या कामाचा / उपक्रमांचा अहवाल

| | |
|---|---|
| शिबीर स्थळ / गावाचे नांव: | उपळाई (ठो) |
| सहभागी महाविद्यालयाचे नांव: | बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी |
| सहभाग तपशील – मुले: 35 मुली: 49 | रासेयो कार्यक्रम अधिकारी महिला: निरंक पुरुष: २ |
| सहभागी रासेयो कार्यक्रम अधिकारी यांचे नांव: | 1) डॉ. संतोष दिगंबरराव जामगे<br>2) प्रा. किरण भागूजी चपटे |
| संबधीत गावाचे सरपंच यांचे नांव व संपर्क: | मा. सौ. संतोषी हरिश्चंद्र कांबळे संपर्क: 9657303071 |
| शिबीर कालावधी: | 16/01/2019 ते 22/01/2019 |

| | |
|---|---|
| प्रथम दिवस | राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उदघाटन बुधवार दिनांक १६ जानेवारी २०१९ रोजी ग्रामपंचायत उपळाई (ठो) येथे सायंकाळी पार पडले. या उदघाटन समारंभास मा. श्री. नंदनजी जगदाळे (उपाध्यक्ष, श्री. शि. शि. प्र. मं., बार्शी) कार्यक्रमाचे उदघाटक व अध्यक्ष म्हणून उपस्थित होत. तसेच कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व्ही. एस. पाटील (सचिव, श्री. शि. शि. प्र. मं., बार्शी) लाभले. या उदघाटन समारंभास प्रमुख उपस्थितीमध्ये प्राचार्य, सरपंच, उपसरपंच व ग्रामस्थ होते. रा. से. यो. चे कार्यक्रमाधिकारी यांनी सात दिवसीय विशेष श्रम संस्कार शिबिराची रूपरेषा सांगितली. या उदघाटन समारंभामध्ये मान्यवरांनी रा. से. यो. च्या स्वयंसेवकांना मार्गदर्शन व शिबीर यशस्वी पार पाडण्यास शुभेच्छा दिल्या. |

| | |
|---|---|
| दुसरा दिवस | गुरुवार दिनांक १७ जानेवारी २०१९ रोजी दैनंदिन कार्यक्रमांतर्गत सकाळी ९ ते १०:३० या वेळेत जनजागरण फेरीच्या माध्यमातून वृक्षारोपण-संवर्धन, स्वच्छता अभियान व जल व्यवस्थापन या विषयावर जनजागरण करण्यात आले. सकाळी १०:३० ते १२:३० या वेळेत ग्रामपंचायत व त्यासमोरील रस्त्याची सफाई करण्यात आली. सायंकाळी ४:३० ते ६:०० या वेळेत बौद्धिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमाच्या माध्यमातून आजच्या युवकांपुढील आव्हाने या विषयावर व्याख्यान देण्याकरिता प्रा. डॉ. प्रदीप पांडुरंग इंगळे यांनी स्वयंसेवक व ग्रामस्थांना मार्गदर्शन केले या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून सुंदरराव उर्फ बाळासाहेब पाटील लाभले. |
| तिसरा दिवस | शुक्रवार दिनांक १८ जानेवारी २०१९ रोजी दैनंदिन कार्यक्रमांतर्गत सकाळी ८:३० ते १२:३० या कालावधीमध्ये वृक्षसंवधनांतर्गत गावातील वृक्षांना आळे करून वृक्षांना काठ्या लावून व पाणी देऊन संरक्षित करण्यात आले. सायंकाळी ४:३० ते ६:०० या कालावधीमध्ये शाश्वत व आधुनिक शेती तंत्रज्ञान या विषयावर मा. श्री. सयाजीराव गायकवाड (कृषी सहायक अधिकारी, बार्शी) यांनी स्वयंसेवक व ग्रामस्थांना मार्गदर्शन केले या कार्यक्रमास अध्यक्ष हनुमंत जामदार हे होते. |

| | |
|---|---|
| चौथा दिवस | शनिवार दिनांक १९ जानेवारी २०१९ रोजी दैनंदिन कार्यक्रमांतर्गत सकाळी ८:३० ते १२:३० या कालावधीमध्ये स्मशानभूमी स्वच्छता व वृक्षसंवर्धन करण्यात आले. सायंकाळी ४:३० ते ६:०० या कालावधीमध्ये प्रा. नित्यानंद थिटे यांनी आधुनिक शेती व शेती पूरक व्यवसाय या विषयावर यांनी स्वयंसेवक व ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. सायंकाळी ७:३० ते १०:३० या कालावधीमध्ये कीर्तनाच्या माध्यमातून वृक्षारोपण-संवर्धन, स्वच्छता अभियान व जल व्यवस्थापन या विषयावर समाज प्रबोधन करण्यासाठी ह. भ. प. कु. भारती आडसूळ यांनी प्रबोधनात्मक कीर्तन केले. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून आबासाहेब ठोगे व मा. श्री. जयकुमार शितोळे उर्फ बापूसाहेब प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. |
| पाचवा दिवस | रविवार दिनांक २० जानेवारी २०१९ रोजी दैनंदिन कार्यक्रमांतर्गत सकाळी ९:०० ते १:०० या कालावधीमध्ये ग्रामस्थांच्या आरोग्यतपासणी करीता जगदाळे मामा हॉस्पिटल यांच्या मार्फत आरोग्य शिबिर घेण्यात आले. या शिबिराचा १२४ ग्रामस्थांनी लाभ घेतला. सायंकाळी ४:०० ते ०६:०० या कालावधीमध्ये व्यक्तीमत्व विकास व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन या विषयावर पी. एस. आय. वाल्मिक तोरणे व प्रा. बी. एस. वडने यांनी स्वयंसेवक व ग्रामस्थ यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष किसान कामगार विद्यालयाचे मुख्याध्यापक शेळके सर उपस्थित होते. |